महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/प्रवेश मान्यता/शै.वि.-३/२०२८/ ३९८२
दिनांक : ०१.०८.२०२४ 01 AUG 2024

**प्रति,**
सर्व प्राचार्य/संचालक,
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी तांत्रिक व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठीची माहिती संस्थांची माहिती पडताळणी अद्ययावत करण्यात आलेली माहिती पडताळणी करणेबाबत..**

**संदर्भ : १.संचालनालाचे पत्र क्र.२/एनजीसी/Intake Approval /२०२४/४४० दि.०३.०७.२०२४**
**२. संचालनालाचे पत्र क्र.२/एनजीसी/Intake Approval /२०२४/५०८ दि.१९.०७.२०२४**
**३. संचालनालाचे पत्र क्र.२/एनजीसी/Intake Approval /२०२४/५२८ दि.२६.०७.२०२४**

उपरोक्त विषयान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबत संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या https://ugpg24.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत करुन दि.१९ जुलै २०२४ पर्यत ऑनलाईन पध्दतीने सादर करणेविषयी संदर्भ क्र. ०१ अन्वये व दि. २६ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भ क्र. ०२ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

सबब अद्यापही काही संस्थांनी माहिती अद्ययावत केलेली नाही. तसचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रवेश प्रक्रियेकरिता विद्यार्थ्यांना नोंदणी करण्याकरीता मुदतवाढ दिलेली आहे. प्रवेश प्रक्रियेकरीता दिलेल्या मुदतवाढीस अनुसरुन सर्व संस्थांनी **दि.३१ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५:०० वाजयेपर्यंत** माहिती अद्ययावत करणे बंधनकारक होते.

ज्या ज्या संस्थानी आपली माहिती अद्ययावत केलेली आहे, अशा संस्थेची माहिती या कार्यालयाकडून प्रमाणित (Approve) करण्यात येत आहे. सबब प्रवेश तांत्रिक व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठीची माहिती संस्थांनी आपल्या लॉगीन मध्ये तपासावी त्यामध्ये तफावत असल्यास दि.०२.०८.२०२४ सायं.०५:०० वाजेपर्यत कळविण्यात यावे. दि.०२.०८.२०२४ नंतर कोणत्याही तफावतीविषयीच्या पत्रावरती कार्यवाही करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**(मा.रा.जाधव)**
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता